साप्ताहिक

■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी  एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.I.N. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ३९ ● मंगळवार, दि. १७ ते २४ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

# वाशिम येथे २१ फेब्रुवारीला पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळावा

**वाशिम, दि.१६ फेब्रुवारी (जिमाका) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर वाशिम तसेच सन्मती अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळावा शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे.**

हा महारोजगार मेळावा सकाळी १० ते सायं. ४ वाजेपर्यंत सन्मती अभियांत्रिकी महाविद्यालय, सावरगाव बर्डे, मालेगाव रोड, वाशिम येथे होणार आहे. मेळाव्यात नामांकित कंपन्यांच्या वतीने प्रत्यक्ष (ऑन द स्पॉट) मुलाखती घेण्यात येणार असून पात्र उमेदवारांना त्वरित नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

यासोबतच रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन तसेच विविध महामंडळांच्या कर्ज योजनांची माहिती देण्यात येणार आहे. जिल्ह्यात यापूर्वी झालेल्या रोजगार मेळाव्यांमधून शेकडो युवक-युवतींना रोजगार मिळाला असून अनेकांनी स्वतःचा उद्योग सुरू केल्याचे सकारात्मक चित्र समोर आले आहे.

राज्य शासनाच्या कौशल्य विकास उपक्रमांमुळे मोठ्या प्रमाणात युवकांना स्थिर रोजगार मिळत असल्याचेही दिसून येते. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवती, आयटीआय, पदवीधर, तांत्रिक शिक्षण घेतलेले उमेदवार तसेच स्वयंरोजगार इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहा आयुक्त प्रवीण खंडारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम येथे किंवा दूरध्वनी क्रमांक ०७२५२-२३१४९४, तसेच प्रदीप नेमाडे (९६२३९३६४८८) व आकाश जैस्वाल (७७७५८१४१५३) यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

## माजी खा. पद्मश्री डॉ. विकास महात्मे माजी यांची साई नेत्रालय रिसोड येथे सदिच्छा भेट



**रिसोड :** पद्मश्री डॉक्टर विकास महात्मे माजी खासदार राज्यसभा यांची साई नेत्रालय रिसोड येथे सदिच्छा भेट रिसोड- - पद्मश्री डॉक्टर विकास महात्मे माजी खासदार राज्यसभा नागपूर यांनी नुकतीच येथील साई नेत्र रुग्णालयाला भेट दिली यावेळी रुग्णालयाचे डॉक्टर मधुकर देशमुख यांनी त्यांचे शाल श्रीफळ व पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला याप्रसंगी पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष मंगेशराव सरनाईक, जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष मोहनराव देशमुख विमा प्रतिनिधी संजय,सरनाईक येथील डॉक्टर प्रशांत आटोळे साहेब,डॉक्टर. मुखमाले वाशिम यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सुद्धा डॉक्टर विकास महात्मे यांचा सत्कार करण्यात आला या हॉस्पिटलचे उद्घाटन डॉक्टर विकास महात्मे यांच्या हस्ते ठरले होते मात्र काही अपरिहार कारणास्तव ते त्यावेळी उपस्थित राहू शकले नाही त्यामुळे त्यांनी सदिच्छा भेट देऊन डॉक्टर देशमुख यांना शुभेच्छा दिल्या( वि. प्र)

## लायसियम स्कूलच्या विद्यार्थ्यांची कुतूहल प्रदर्शनाला भेट

**रिसोड :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय वाशिम येथील कुतूहल - द सायन्स एक्सिबिशन या विज्ञान प्रदर्शनाला लायसियम स्कूल रिसोडच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. या शैक्षणिक दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांनी विज्ञान व तंत्रज्ञानाशी संबंधित आधुनिक संकल्पना जवळून अनुभवत समजून घेण्याचा प्रयत्न केला.

प्रदर्शनातील विविध वैज्ञानिक मॉडेल्स, प्रयोग आणि तंत्रज्ञानाचे विद्यार्थ्यांचे विशेष आकर्षण ठरून गेले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने प्रदर्शनाचा आनंद घेतला व विज्ञानातील संकल्पना समजून घेण्यासाठी प्रश्न विचारले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची विज्ञान शैक्षणिक आकलन क्षमता वाढल्याचे शिक्षकांनी सांगितले. लायसियम स्कूल रिसोडचे विद्यार्थ्यांसाठी नेहमीच विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा आणि समाधानाची अभिवृद्धी होण्यासाठी असे प्रकारचे शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांच्या ज्ञानाची क्षितिजे रुंदावतात. 'या प्रदर्शनामुळे आमच्यासाठी ज्ञानाचा महासागर खुला झाला,' असे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. भविष्यातही अशा प्रकारच्या शैक्षणिक प्रवासात भाग होण्याची इच्छा विद्यार्थ्यांनी उत्साहाने व्यक्त केली. एकूणच, हा विज्ञान प्रदर्शनाचा अनुभव लायसियम स्कूल रिसोडच्या विद्यार्थ्यांसाठी आनंददायी, प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरला. श.प्र.

# सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम उपविभाग रिसोड उपअभियंता नसल्याने नागरिकांना त्रास

**गणेश देगावकर**

**रिसोड :** सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम उपविभाग रिसोड वाशिम येथील उपकार्यकारी अभियंता यांच्याकडे अतिरिक्त पदभार असून सुद्धा सदर अधिकारी हे कधीच रिसोड येथील कार्यालयात दिसून येत नाहीत. सदर रिसोड येथील (झथृ) चे उपअभियंत्याचे पद गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त असल्यामुळे तालुक्यातील विविध विकासकामांवर मोठा परिणाम होत आहे. यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अनेक महत्त्वाची कामे रखडली आहेत.तालुक्यातील रस्ते दुरुस्ती, पुलांची देखभाल, शासकीय इमारतींची दुरुस्ती, नाल्यांचे बांधकाम तसेच ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या कामांवर उपअभियंत्याच्या अनुपस्थितीचा थेट परिणाम दिसून येत आहे. तांत्रिक मंजुरी, मोजमाप, पाहणी व




बिल मंजुरीसारखी महत्त्वाची कामे वेळेवर होत नसल्यामुळे ठेकेदार तसेच नागरिक दोघेही अडचणीत सापडले आहेत. नागरिकांच्या तक्रारी वाढल्या असून अनेक वेळा कार्यालयात चकरा मारूनही समस्या सुटत नसल्याची भावना व्यक्त केली जात आहे. काही रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून पावसाळ्यात अपघातांचा धोका वाढत आहे. तसेच शाळा, आरोग्य केंद्रे व इतर शासकीय इमारतींच्या दुरुस्तीची कामेही प्रलंबित आहेत. स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाकडे तात्काळ उपअभियंत्याची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे. विकासकामे वेळेवर झाली नाहीत तर परिसराच्या प्रगतीला मोठा अडथळा निर्माण होईल, अशी प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. दरम्यान, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या रिक्त पदाबाबत लवकरच निर्णय घेऊन पर्यायी व्यवस्था करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले आहे. मात्र, प्रत्यक्षात अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.प्रशासनाने तातडीने उपअभियंत्याची नियुक्ती करून रखडलेली कामे मार्गी लावावीत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## आसेगाव पेन परिसरात स्प्रिंकलर तोट्यांची चोरी!

**रिसोड :** तालुक्यातील आसेगाव पेन परिसरात शेतशिवारात स्प्रिंकलरच्या तोट्यांच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याने शेतकरी चिंतित आहेत. १२ फेब्रुवारीच्या मध्यरात्री ही चोरीची घटना घडली असून, १३ फेब्रुवारी रोजी सकाळी उघडकीस आली.

रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी अनेक शेतकरी स्प्रिंकलर वापरतात. काही शेतकऱ्यांनी शेवटचे पाणी दिल्यानंतर स्प्रिंकलरच्या तोट्या एकत्र करून शेतातच ठेवल्या होत्या. अज्ञात चोरट्यांनी छोट्या पाईपमधून या तोट्या काढून नेल्याचे निदर्शनास आले. सुमारे आठ ते दहा शेतकऱ्यांच्या शेतातील स्प्रिंकलर तोट्या चोरीला गेल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेमुळे पैनगंगा नदीकाठावरील शेतकरी आर्थिक नूकसानामुळे



हवालदिल झाले आहेत. विश्वनाथ सोनाजी रेखे, किसन त्र्यंबक रेखे, विठ्ठल त्र्यंबक रेखे, शिवाजी खानझोडे, अशोक खानझोडे, अहमद पठाण, नरवीर पठाण, शाहिद पठाण, तुकाराम रेखे, सुनील खानझोडे, अमोल खानझोडे, शामराव खानझोडे आणि अर्जुन खानझोडे या शेतकऱ्यांचा शेतामधून तोट्यांची चोरी झाली आहे. चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# मुंबईला तिसरा डबा

मुंबईत पूर्वी लोकल गाड्यांना नऊ डबे असत. मग बारा डब्यांच्या गाड्या सुरू झाल्या. डब्यांची संख्या वाढली तरी बहुतेक रेल्वे स्टेशनचे फलाट जुनेच म्हणजे कमी लांबीचे होते. मग काही दिवस गाड्या दोनदा थांबवाव्या लागत. आधी पुढचे डबे फलाटाला लागत. नंतर गाडी पुढे घेऊन उरलेल्या डब्यातली माणसे फलाटावर उतरू शकत. आता पंधरा डब्यांच्या गाड्यांची मागणी होते आहे. भविष्यात ती २१ डब्यांचीही होईल. मुंबईतल्या रेल्वेलाच नव्हे तर या शहरालाही सतत असे नवनवे डबे जोडणे चालू असते. १९७० च्या दशकात नवी मुंबईचा दुसरा डबा तिला जोडला गेला. त्यामुळे मुख्य शहरातली गर्दी कमी होईल असे सर्वांना वाटले. प्रत्यक्षात तसे काहीच घडले नाही. आज पालघरपासून खोपोलीपर्यंत आणि कसाऱ्यापासून पेणपर्यंत मुंबई पसरतच चालली आहे. आता तिला तिसऱ्या मुंबईचा आणखी एक डबा जोडण्याचे चालू आहे. शिवडी-न्हावा सागरी पूल लवकरच खुला होईल. त्याच्या आजूबाजूला तिसरी मुंबई वसवण्याच्या प्रकल्पाला राज्य सरकारने मान्यता दिल्याच्या बातम्या आहेत. उलवे, उरण, पेण, पनवेल, कर्जत या भागातील ३२३ चौरस किलोमीटर पट्ट्यात हे नवे शहर वसवले जाईल. यासाठी १२४ गावांमधील जमीन मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत संपादित केली जाईल असे या बातम्यांमध्ये म्हटले आहे. विशेष म्हणजे यासाठी नैना प्रकल्पातील ७७ गावे तेथून वगळून तिसऱ्या मुंबईत समाविष्ट केली जातील. शिवाय खोपटा नवे शहरमधील ३३ गावेही त्यात असतील. नवी मुंबईच्या विकासाची जबाबदारी ज्याप्रमाणे सिडकोवर देण्यात आली होती त्याप्रमाणे मुंबईला नवा डबा जोडण्याचे काम न्यू टाऊन डेव्हलपमेंट ऑथॅरिटी किंवा नवनगर विकास प्राधिकरण नावाच्या संस्थेकडे सोपवले जाईल. गावांची संख्या भविष्यात दोनशेपर्यंत जाईल असाही एक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

गेल्या काही वर्षात मुंबईचा विकास व विस्तार यांचा सर्वाधिक परिणाम रायगड जिल्ह्यावर झाला आहे. मुंबईच्या विस्ताराच्या पहिल्या टप्प्यात सुमारे सत्तर वर्षांपूर्वी हीच स्थिती ठाणे जिल्हयाची झाली. त्यावेळी डोंबिवली, कल्याण ते कसारा आणि इकडे बोरीवली ते पालघर (तेव्हा तो स्वतंत्र जिल्हा नव्हता) हा पट्टा मुंबईत ओढला गेला. नवी मुंबई वसवली जाण्याच्या काळात मुंबईच्या विकासाने रायगड जिल्ह्यात हातपाय पसरले. पनवेल हे मुंबईचे उपनगर बनले. तिकडे कर्जत व खोपोलीपर्यंत लोकल जाऊ लागल्याने तीदेखील मुंबईशी अधिक जोडली गेली. आता तिसरा डबा किंवा तिसरी मुंबई वसवताना उत्तर रायगडचा बराचसा भाग मुंबईत विलीन होणार आहे. उरणपर्यंत रेल्वे पोचल्यानंतर आणि शिवडीला रस्तेमार्गाने जोडले गेल्याने हे होणारच होते. पण आता तिसऱ्या मुंबईच्या रुपाने हा विकास अधिक नियोजनपूर्वक होणार आहे. याचे चांगले आणि वाईट असे दोन्ही परिणाम आहेत. विकासाच्या पहिल्या टप्प्यात रेल्वेने गावे जोडत गेली तसतशी तेथील वस्ती वाढत गेली. मात्र त्यावर सरकारचे कोणतेच नियंत्रण नव्हते. तेव्हाच्या सरकारने तशी दृष्टीही ठेवली नव्हती. ठाण्याच्या पुढची कळवा, दिवा, डोंबिवली, कल्याण इत्यादी अनेक रेल्वे स्टेशन्स व तेथे झालेला विकास हा या नियोजनशून्यतेची साक्ष देतो. या सर्व इलाख्यांमध्ये वाटेल तशी बांधकामे झाली आहेत. रस्त्यांची नीट सोय नाही. त्यामुळे बहुतांश भाग कमालीच्या गर्दीचे, घाणीने भरलेले व सदैव वाहतूक कोंडीत अडकलेले असे दिसतात. नवी मुंबई वसवताना हे सर्व टाळण्याचा प्रयत्न केला गेला.

## निशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रियेचा लाभ घेण्याचे आवाहन

रिसोडः महाशिवरात्री निमित्त रिसोड येथे निशुल्क नेत्र तपसणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन १२ फेब्रुवारी २०२६ गुरुवारला करण्यात आले आहे

येथील ग्रामीण रुग्णालय सरकारी दवाखाना रिसोड येथे आयोजित या शिबिरा मध्ये मोफत नेत्र तपासणी व योग्य उपचार करण्यात येणार आहे. ज्या रुग्णांना मोतीबिंदू असेल त्या रुग्णाची लवकरात लवकर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रिया उदयगिरी लॉयन आय हॉस्पिटल उदगीर व जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम या



ठिकाणी करण्यात येणार आहे. मोतीबिंदू रुग्णांसाठी ऑपरेशन करिता ने-आन करण्याची तसेच राहण्याची आणि जेवणाची निशुल्क व्यवस्था समता फाउंडेशन मार्फत करण्यात येणार आहे नेत्र तपासणी करिता नोंदणी करण्यासाठी .मन्नालाल अग्रवाल स्किल डेव्हलपमेन्ट टेकनॉलॉजि निजामपूर व संत अमरदास अर्बन बँक बगडिया कॉम्प्लेक्स रिसोड येथे संपर्क करण्याचे आवाहन आयोजकाचे वतीने करण्यात आले आहे (वि. प्र)


# नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर यांनी जाणून घेतल्या नागरिकांच्या समस्या

## रिसोड शहराचा विकास होणार आता गतिमान

**रिसोड :** शहरातील रस्ते, नाली व पाणीपुरवठ्यासह विविध नागरी समस्या घेऊन १२ फेब्रुवारी रोजी काही नागरिकांनी नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर यांची भेट घेतली. यावेळी नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही नगराध्यक्षांनी दिली.

नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर क्षीरसागर यांनी कामकाजाला गती दिली आहे. पहिल्या टप्प्यात सौरऊर्जा प्रकल्पासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याबाबत तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली होती. त्यानंतर विविध प्रभागांमधून येणाऱ्या नागरिकांच्या समस्या थेट ऐकून त्यावर कार्यवाही करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली व सर्वांच्या सहकार्याने रिसोड शहराचा कायापालट करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्यात येत असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी नगर परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाजाला गती देऊन नागरिकांच्या तक्रारींचा तातडीने निपटारा करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

**आम्ही रिसोड शहराचा विकासासाठी कटिबद्ध असून येणाऱ्या कार्यकाळात रिसोड शहर हे विकास मय होऊन जाईल त्यामध्ये जनतेच्या पाण्याचा प्रश्न . असो नालेसफाई . आरोग्य विषयक . अनेक विकास कामे गतिमान होतील व रिसोड शहरातील जनतेच्या समस्या २४ तास जाणून घेतल्या जातील व जनतेच्या समस्या त्वरित सोडवल्या जातील .**



भगवानराव क्षीरसागर
नगराध्यक्ष
नगरपरिषद रिसोड

### ई–निविदा सुचना

महाराष्ट्र शासन

# मृद व जलसंधारण विभाग

जिल्हा जलसंधारण अधिकारी, यांचे कार्यालय, वाशिम

पत्ता : जुनी जिल्हा परिषद इमारत परिसर, वाशिम ४४४५०५

## ई–निविदा सूचना क्र. २६ सन २०२५–२०२६ (दुसरी वेळ)

महाराष्ट्र राज्य राज्यपालांच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, वाशिम हे महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाकडील **नोंदणीकृत कंत्राटदाराकरीता** खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. सविस्तर ई-निविदा सुचना बाबत सर्व माहिती शासनाचे संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, वाशिम यांनी राखून ठेवला आहे. सदर निविदा सुचनामध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. **(सदर काम हे जिल्हा नियोजन समिती, वाशिम सन २०२५-२६ अंतर्गत मंजुर करण्यात आले आहे.)**

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदाची अंदाजित किंमत | बयाणा रक्कम रुपये | ई-निविदा संचाची किंमत रु. | काम करण्याचा कालावधी | कंत्राटदाराला नोंदणीचा किमान वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पूर संरक्षक भिंत गट क्र. २६६ जवळ मौजे - घोटा ता.जि. वाशिम येथील काम | १४४०४०३ | १४५०० | २३६० | १२ महिने | सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदारा करीता राखीव |
| २ | सिमेंट साठवण बंधारा मौजे - भर जहांगीर ता. रिसोड जि. वाशिम येथील काम | १६८४३८३ | १६९०० | २३६० | १२ महिने | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ई -निविदा उपलब्ध कालावधी | -- | दिनांक | १६/०२/२०२६ (१२.००) | ते दिनांक | २२/०२/२०२६ (१८.००) |
| २ | ई- निविदा उघडण्याचा कालावधी | --- | दिनांक | २३/०२/२०२६ (१८.०१) | | |

### खालील ठिकाणी ई-निविदाबाबतची सर्व माहिती उपलब्ध आहे

१) ई-निविदा **दिनांक - १६/०२/२०२६ पासुन** http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध राहील. (निविदा सुचनामध्ये काही बदल असल्यास उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध राहील.)

२) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, वाशिम यांचे कार्यालयातील सुचना फलकावर उपलब्ध आहे.

३) संकेतस्थळावर प्रसिद्ध होणाऱ्या वेळापत्रकानुसार निविदा उघडण्याची तारीख व वेळेप्रमाणे कंत्राटदाराने किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहावे. अन्यथा निविदा उघडण्याची कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

४) सदर कामाची निविदा प्रक्रीया ही शासन निर्णय महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग क्र.-निविदा /०४१७/प्रा.क्र. २४७/ मो.प्रा.-१ दिनांक १८/१०/२०२३ अन्वये राबविण्यात येईल.

स्वाक्षरीत/-

**जिल्हा जलसंधारण अधिकारी**

मृद व जलसंधारण विभाग, वाशिम

वि.मा.का. /अम./जाहि./१४१/२०२६

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# ब्रह्माकुमारीज केंद्रात महाशिवरात्री उत्साहात साजरी

## संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती दीदींच्या हस्ते शिवध्वजारोहण





रिसोड :- प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय रिसोड येथे रविवारी 15 फेब्रुवारीला सकाळी सहा ते दहा वाजेपर्यंत महाशिवरात्रीच्या शुभ पर्वावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.ब्रह्माकुमारीज सेवा केंद्र रिसोडच्या संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी ज्योती दिदी यांच्या मार्गदर्शनाखाली महाशिवरात्रीनिमित्त विशेष योग तपस्या करण्यात आली. ज्योती दीदींच्याच्या शुभ हस्ते शिवध्वजारोहण करण्यात आले. दीदींनी उपस्थितांना महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व स्पष्ट केले. महाशिवरात्री हा भारतीयांसाठी अनेक धार्मिक उत्सवापैकी एक अतिमहत्त्वाचा धार्मिक उत्सव आहे.परमपिता शिव परमात्मा यांचा अवतरण दिवस म्हणजे महाशिवरात्री शिवबाबांचे 90 वर्षांपूर्वी या सृष्टीवर आगमन झाले तेव्हापासून नवीन युगाच्या म्हणजे सतयुगाच्या निर्मितीसाठी शिवबाबा निष्काम सेवा करीत आहे.आपल्या सर्वांना अज्ञान अंधःकारातून बाहेर कडून ज्ञान रुपी प्रकाश केला. त्यामुळे आत्मा आणि परम्यात्म्याचा परिचय मिळाला. द्वापार युगापासून संचित विकारांचा विनाश केवळ शिवपरमात्म्याला यथार्थ स्मरण करूनच केला जाऊ शकतो त्यासाठी प्रत्येक मनुष्य आत्म्याला बाबाचा परिचय असणे आवश्यक आहे.ईश्वरीय ज्ञान मिळाल्यामुळे आपले जीवन हिऱ्याप्रमाणे झाले आहे तर हे ज्ञान प्रत्येक मनुष्याला मिळावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे हे ब्रह्माकुमारीज परिवाराचे कर्तव्य आहे. सर्व उपस्थिताना दीदींनी विकार मुक्त, द्वेषमुक्त, क्रोधमुक्त जीवन जगावे व ईश्वरीय ज्ञानाला आत्मसात करून स्वपरिवर्तन करून विश्वपरिवर्तक बनावे अशी प्रतिज्ञा दिली.शिवजयंती म्हणजे परमात्मा शिवबाबाचा जन्मदिवस तसा तो प्रत्येक मुलाचा सुद्धा जन्मदिवस आहे म्हणून तो आनंदाने साजरा करताना स्वतःमधील दुर्गुण परमात्म्याला अर्पण करून जन्मदिवसाची भेट द्यावी असे मनोगत दीदींनी व्यक्त केले.प्रसंगी कु.श्रेया दबडे, कु.शुभांगी , कु सृष्टी , कु. चैतन्या व कु. तनुश्री यांनी बाबांच्या गीतांवर सुंदर नृत्य केले व उपस्थिताचा आनंद द्विगुणित केला.नृत्य करणाऱ्या सर्व कन्यांना ज्योती दीदींनी पुष्पगुच्छ देऊन प्रोत्साहित केले. महाशिवरात्रीच्या पर्वाला साजरा करण्यासाठी ब्रह्माकुमारीज सेवा केंद्र रिसोडच्या सहसंचालिका गीता दिदी, वंदना दिदी यांच्या सह ब्रह्माकुमारीज परिवारातील ज्ञानार्थी भाऊ बहिणींनी महत्वपूर्ण सहकार्य केले. सर्व भाऊ बहिणींना महाशिवरात्रीनिमित्त प्रसादाचे (भोग) वाटप करून कार्यक्रमांची सांगता करण्यात आली.

# रिसोड आगरवाडी रस्त्याची भिषण अवस्था

## रस्त्या बनवण्याची नागरिकांची मागणी





रिसोड : रिसोड साखरा रस्त्याच्या मधील रिसोड आगरवाडी पर्यंतच्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे.हा रस्ता एवढा खराब झाला आहे की रस्त्याची अक्षरशः चाळणी झालेली आहे. वाहनधारकांना वाहन चालवताना अत्यंत काळजी घ्यावी लागते.रस्त्यात खड्डे कि खड्यात रस्ता कळणे कठीण झाले आहे. त्यामुळे वाहनधारकांचेही आर्थिक नुकसान होत आहे. दिनांक 14 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजताच्या दरम्यान असंख्य नागरिक या रस्त्यावर थांबले.या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे लक्ष द्यावे अशी मागणी करण्यात आली. यावेळी वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या तर काही वेळ वाहतूक विस्कळीत झाली होती. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार सदर रस्त्याची दैनिय अवस्था वीस वर्षापासून आहे. याकडे शासन प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे.अनेक वेळा मागणी करून सुद्धा या मागणीकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोपही स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वाहनांचे काही प्रमाणात नुकसान होत आहे.वाहतुकीच्या दृष्टिकोनातून हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता मराठवाड्यातील परभणी जिल्ह्याला जोडतो.त्यामुळे त्याचे महत्त्व खूप वाढतो.नुकताच हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने आगरवाडी ते चिंचाभर विदर्भ मराठवाडा हद्दीपर्यंत बांधला आहे. मात्र आगरवाडी ते रिसोड हा रस्ता एवढा खराब झाला आहे की, वाहन चालवताना क्षणभरही शांत बसत नाही. एकूण 5 ते 7 मिनिटांच्या या प्रवासाला 20 ते 25 मिनिटे लागत आहेत. सदर रस्त्यावर अनेक अपघात होऊन नागरिकांना अपंगत्व आले असल्याची माहिती समोर आली असून या रस्त्यावर मोठ मोठ्या शाळा सुद्धा आहेत या शाळेवर रिसोड सह मराठवाड्यातील विद्यार्थी सुद्धा शिक्षण घेण्याकरिता येत आहेत. विद्यार्थ्यांना सुद्धा या रस्त्याचा त्रास सहन करावा लागत आहे शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्रीस आणण्यासाठी तारेवरती कसरती रस्त्यावर करावी लागत आहे. अशा स्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर हा रस्ता तयार करून वाहनधारकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# ज्ञानदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय रिसोड येथे रौप्य महोत्सव



**रिसोड :** ज्ञानदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय रिसोड येथे रौप्य महोत्सव आज मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या महोत्सवासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जीवन विकास शिक्षण संस्थेचे सचिव अमित खडसे पाटील उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यापक सुरेश देशमुख तसेच शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका तवर मॅडम उपस्थित होत्या. तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ही दीप प्रज्वलाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदरणीय खानझोडे सर यांनी केले. प्रास्ताविक पर भाषणात त्यांनी शाळेच्या २५ वर्षाच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरनाईक मॅडम यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेसाठी अविरत काम करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सर्वप्रथम अमित खडसे पाटील यांनी शाळेचे मुख्याध्यापक सुरेश देशमुख यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले. त्यानंतर आदरणीय भुतेकर , पांडे व सरनाईक यांचा सुद्धा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला यानंतर क्रीडा सप्ताहात वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रशस्तीपत्र व ट्रॉफी देऊन कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आदरणीय जोगदंड सर यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला आदरणीय आखाडे , राठोड पांडे , धामणकर , पडघान ,शिंदे , उपस्थित होते. रौप्य महोत्सव शाळेच्या इतिहासातील एक अविस्मरणीय क्षण ठरला..श.प्र.

# उर्दु ज्युनियर कॉलेजमध्ये दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



रिसोड : डॉक्टर अल्लामा इकबाल माध्यमिक उच्च माध्यमिक सेमी इंग्रजी विद्यालय मध्ये दिनांक ०७ ०२ २०२६ दहावी बारावी विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आले मुख्याने शाळेचे संस्था अध्यक्ष माननीय कबीर मोहसीन यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य जमीर अहमद खान यांनी मांडले शाळेतील प्राध्यापक दानिश अहमद यांनी आपल्या मनोगत द्वारे पुढील शिक्षणाकरिता प्रेरित केले शाळेचे अध्यक्ष माननीय कबीर मोहसीन साहेबांनी आपल्या भाषणाद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असे म्हटले की आज प्रत्येक क्षणी परिवर्तन पाहायला मिळत आहे.

प्रगतीची पहिली सीढी म्हणजे बारावी उत्तीर्ण करणे होय नंतर उच्च शिक्षण घेऊन मोठमोठे महर्षी बनता येते आपल्या अंगी शिस्त बाळगणे खूप महत्त्वाचे आहे शिस्त हे व्यक्तिमत्व विकसित करते असे शिक्षणाची कास धरून मोठे व्हाव आपल्या घराण्यात व समाजात नावलौकिक करा असे अनेक उदाहरणार्थ द्वारे विद्यार्थ्यांना प्रगतीच्या पथावर अग्रेसर करण्यासाठी प्रेरित केले आभार प्राध्यापक मोहम्मद अबुल आला सर यांनी मानले या प्रसंगी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. श.प्र.

# राजस्थान कॉन्व्हेंट च्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात आपले कौशल्य दाखवले





रिसोड : 14 फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेची आणि कल्पकतेची अनोखी झलक पाहायला मिळाली. 'शाश्वत विकासासाठी विज्ञान' या संकल्पनेवर आधारित या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे माननीय डॉक्टर पुरुषोत्तम बियाणी यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी प्रमुख अतिथी डॉक्टर आदिनाथ बदर सर व सौ अर्चना बदर मॅडम तसेच स्कूल मॅनेजमेंट कमिटी सदस्य श्री. मनोज जाधव सर व श्री. राजेंद्र करवा सर उपस्थित होते.प्रदर्शनात इयत्ता केजी ते 9 वीच्या विद्यार्थ्यांनी 50 हून अधिक नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. यामध्ये प्रामुख्याने स्मार्ट सिटी, सौर ऊर्जा, कचरा व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन, कार्बन प्युरिफायर, एअर प्युरिफायर, ट्रॅफिक लाईट ,स्ट्रीट लाईट सिस्टीम ,सोलर एनर्जी सिस्टीम, आर्ट अँड क्राफ्ट आणि शेतीसाठी उपयुक्त तंत्रज्ञान या विषयांवर आधारित मॉडेल्स लक्षवेधी ठरले. विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नांचे उपस्थितांकडून भरभरून कौतुक करण्यात आले. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी अशा प्रदर्शनांचे आयोजन करण्यात यावे असे उद्गार काढले व कौतुक केले. प्रदर्शनाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे आणि त्यांना दैनंदिन समस्यांवर वैज्ञानिक उपाय शोधण्यास प्रवृत्त करणे हा होता, असे प्राचार्य प्रदीप सराफ यांनी सांगितले. या विज्ञान प्रदर्शनाला स्थानिक नागरिक आणि पालकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उप- प्राचार्य मनोज पातळे यांनी केले विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# माफियांकडून जप्त केलेल्या रेतीचे घरकुल लाभार्थींना वितरण


घरकुल लाभार्थींना जप्तीच्या रेतीचे वितरण करताना महसूल विभागाचे कर्मचारी

## रिसोडच्या तहसीलदारांचा पुढाकार

**रिसोड :** तालुक्यात रेतीच्या अवैध साठ्यावर महसूल प्रशासनाने कारवाई करत सकारात्मक पाऊल उचलले आहे. येवती येथील गट क्रमांक ३४२ मधील सरकारी ई-क्लास जमिनीवर विनापरवाना साठवून ठेवलेला अंदाजे ४८ ब्रास रेतीचा साठा जप्त करून तो थेट घरकूल लाभार्थ्यांना मोफत वितरित करण्यात आला.

तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनात तथा नायब तहसीलदार गजानन जवादे, मंडळ अधिकारी जी. एल. गरकळ यांच्या देखरेखीत कारवाई करण्यात आली. रेती अवैध साठ्यावर कारवाई करतानाच जप्त केलेला माल गरजू व पात्र लाभार्थ्यांच्या उपयोगासाठी देण्याचा निर्णय घेतल्याने प्रशासनाची ही कारवाई सामाजिकदृष्ट्याही उपयुक्त ठरली आहे. दरम्यान, विनापरवाना रेती साठवून ठेवणाऱ्यांवर यापुढेही धडक कारवाई केली जाईल, असे तहसीलदारांनी सांगितले.

## १२ लाभार्थ्यांना प्रत्येकी ४ ब्रास रेती!

गावातील १२ घरकूल लाभार्थ्यांना प्रत्येकी ४ ब्रास याप्रमाणे एकूण ४८ ब्रास रेतीचे मोफत वितरण करण्यात आले. लाभार्थ्यांमध्ये द्वारकाबाई मारोती शिंदे, पार्वती नाथा घनवे, कावेरी भीमराव शिंदे, कलावती जयराम दवणे, पार्वती सदाशिव ढोरे, लीलावती आत्माराम दळवे, रुखमाबाई महादेव टाकसाळ, बंडू केशव शिंदे, गजानन संपत शिंदे, शारदाबाई मारुती शिंदे, कैलास सखाराम बोकन व दत्तराव सखाराम बोकन यांचा समावेश आहे.

**“ रिसोड तालुक्यात आतापर्यंत जप्त करण्यात आलेली १८४ ब्रास रेती ११२ घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाटप करण्यात आली आहे. गौण खनिज साठ्याविरुद्ध कठोर भूमिका आणि गरजूंना थेट मदत हा दुहेरी हेतू साध्य होत आहे.**

**- प्रतीक्षा तेजनकर,** तहसीलदार, रिसोड

# मुदतपुर्व मुक्ततेसाठीचे मार्गदर्शक तत्वे सुधारणा समितीचे गठण

## समिती अध्यक्ष सेवानिवृत्त न्याययमुर्ती मा.गोविंदराव सानप

**रिसोड :** जिल्ह्याचे सुपुत्र सेवानिवृत्त न्यायमुर्ती गोविंदराव आनंदराव सानप यांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या शिरपेचात अनेक मानाचे तुरे खोवल्या जात आहेत.नुकतीच त्यांची महाराष्ट्र क्रिकेट संघटनेवर प्रशासक म्हणुन नियुक्ती झाल्या नंतर आता. राज्यातील कारागृहातीलक शिक्षा बंद्यांच्या मुदतपूर्व मुक्तेच्या मार्गदर्शक तत्वाचे नव्याने तयार करावयाचे आदेश समितीच्या अध्यक्ष पदी निवड झाली आहे.सदर निवड ही मा.सर्वोच्च, न्यायालय नवी दिल्ली यांच्या आदेशानुसार झाली आहे.ही बाब नक्कीच जिल्हा वाशीयासाठी अभिमानास्पद आहे.

उरोक्त आदेशानुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने,शासणाच्या यापुर्वीच्या दिनांक १६ नोव्हेंबर १९७८,११मे १९९२, ११ एप्रिल २००८,सह १३ जुन २००८ व दिनांक १५ मार्च २०१० या मार्गदर्शक सुचनांचा आढावा घेऊन त्यामध्ये सरकारने वेळोवेळी नव्याने लागु केलेले कायदे व त्या अनुशंगाने केलेल्या शाक्षेच्या तरतुदी विचारात घेऊन,सुधारीत सुचना तयार करण्याचे निर्देश दिले आहे. सुधारीत मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी या संदर्भातील विविध क्षेत्रातील तज्ञांची समिती गठीत करण्यात आलेली आहे.या समितीचे अध्यक्ष सेवानिवृत्त न्यायमुर्ती गोविंदराव सानप उपाध्यक्ष अपर मुख्य सचिव,अपिल व सुरक्षा,गृह विभाग,मंत्रालय मुंबई.सदस्यपदी श्रीमती सुप्रिया पाटील,पोलिस महानिरीक्षक (प्रशासन) पोलिस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई, श्री रामचंद्र दामोदर संख्ये,सेवानिवृत्त सहसचिव (विधी) मा.उच्च न्यायालयाच्या नाम तालीकेवरील लवाद व मध्यस्थ,डॉ.मैथिली उमाटे,सहयोगी प्राध्यापक, मनोविकृती शास्त्र विभाग,ग्रांट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ज.जी. रूग्णालय मुंबई, सदस्य सचिव श्री सुहास वारके,अपर पोलीस महासंचालक तथा महानिरीक्षक कारागृहे व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे यांची समिती गठीत झाली आहे.

सदर समितीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कारागृहातील शिक्षा बंद्याच्या मुदतपुर्व मुक्तेच्या मार्गदर्शक तत्वांचे नव्याने करावयचे आदेश,मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशानुसार शासणाने सहा महिण्यामध्ये करायचे आहेत.त्यामुळे उपरोक्त समीतीने यापुर्वी मार्गदर्शक सुचनांचा तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या कायद्यांचा ,तसेच यापुर्वीच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये समाविष्ट नसलेल्या तथापी,मुदतपुर्व मुक्तेच्या संदर्भात आवश्यक असलेल्या मुद्यांचा समावेश सुधारीत करून सुधारीत मार्गदर्शक तत्वांचा



अहवाल तीन महिन्यांत शासनास सादर करण्याची जबाबदारी या समितीवर आहे.सेवानिवृत्त न्यायमुर्ती गोविंदराव सानप यांच्या या समितीच्या अध्यक्षपदा वरील निवडीने नक्किच कारागृहातील बंदीस्थ कैद्यांच्या जिवनाला पालवी फुटण्याचे संकेत निर्माण झाले आहे.सदर समितीचे अध्यपदी सेवानिवृत्त न्यायमुर्ती गोविंदराव आनंदराव सानप यांची निवड झाल्याने जिल्ह्यासाठी ही अभिमानास्पद बाब आहे.

# रिसोड-मेहकर निर्माणधिन रस्त्याचे काम संथ गतीने

## बांधकामावर अधिकारी, लोकप्रतिनिधी बघ्याची भूमिका



रिसोड : दळणवळण (रस्ते, पूल, महामार्ग, सार्वजनिक वाहतूक) हे कोणत्याही भागाच्या सर्वांगीण विकासाचे मूलभूत पाऊल मानले जाते. प्रभावी दळणवळण व्यवस्था केवळ प्रवास सुलभ करत नाही तर अर्थव्यवस्था, शिक्षण, आरोग्य आणि उद्योग क्षेत्रालाही चालना देते. विकासाचे पहीले पाऊल हे ब्रीदवाक्य घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग ग्रामीण भागामध्ये रस्त्याचे जाळे विणत आसतांनी रिसोड ते मेहकर या राज्य मार्गाचे मागील अनेक वर्षापासुन अतिशय संथगतीने काम सुरू असल्याने आता पर्यंत तीन बळी गेले आसुन अनेकांना गंभीर दुखापतीला सामोर जावे लागले आहे या मार्गाच्या समस्या प्रसारमाध्यमांमध्ये अनेक वेळा मांडूनही आणि नागरिकांनी असंख्य तक्रारी करूनही प्रशासनातील अधिकारीआपल्या वेळ काढू धोरणामुळे जनतेच्या समस्या ची दखल सुद्धा घेत नसल्याचे दिसत आहे. राजकीय दृष्ट्या एकमेकांचे कट्टर विरोधी पक्ष , नेते सत्तेच्याहीता साठी एकत्र येतात मात्र ठेकेदाराच्या नियोजनअभावी अनेक अपघात व निष्पाप बळी घेतलेल्या रस्ताकामाची गती वाढविण्यासाठी एकत्र येण्याची 'ॲल्जी' आहे का? हा यक्ष प्रश्न सध्या नागरीकाना पडला आहे.

रिसोड ते मेहकर दरम्यान सुरू असलेल्या निर्माणाथीन रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेक महिन्यांपासून काम रखडलेले असून ठिकठिकाणी अर्धवट सिमेंट कॉंक्रिटीकरण, खड्डे आणि उखडलेला रस्ता यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रिसोड शहर हे जिल्ह्याची राजकिय राजधानी म्हणुन संभोधल्या जाते, सत्तेतील दोन आमदारआणि विरोधी पक्षांचे एक आमदार असे तीन आमदार तसेच राजकीय मात्तबरांचे हे माहेर घर आसुन अनेक पक्षाचे जिल्हाध्यक्ष याच तालुक्यातील आहेत.

रिसोड ते मेहकर या रस्त्यावर मात्र कोणताच पक्ष किंवा पदाधिकारी चक्कार बोलत नाहीत. तेव्हा नागरिकांना या लोक प्रतिनिधी संदर्भात अनेक प्रश्न उभे राहात आहेत. कि सत्तेच्या फारीपाटा साठी एकमेकांचे कट्टर स्पर्धक सत्तेची चाबी काबीज करण्यासाठी एकमेकां सोबत पायघड्या घालत आसतांनी रिसोड ते मेहकर या मार्गाच्या कासवगतीने होत आसलेल्या कामाला वेग आणण्या साठी राजकीय पक्ष किंवा लोकप्रनिधी एकत्र येऊन जणहीतासाठी आवाज का उठवत नाहीत. या मागचे गौडबंगाल नेमके आहे .

### वारंवार तक्रारी करुनही कामाच्या गतीमध्ये सुधारणा नाही

या मार्गावरील नागरिकांचे मते संबंधित विभागाचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत नसून केवळ पाहण्याची भूमिका घेत आहेत. वारंवार तक्रारी करूनही कामाच्या गतीत अपेक्षित सुधारणा झालेली नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधी व प्रशासनाने तातडीने लक्ष घालून रस्त्याचे काम वेळेत व दर्जेदार पूर्ण करावे, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

# श्री चाफेश्वर महादेव भव्य पालखी सोहळा उत्साहात संपन्न









रिसोड येथे श्री चाफेश्वर महादेव संस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दि.१५ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेला भव्य पालखी सोहळा मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी पाहायला मिळाली.पालखीची सजावट आकर्षक फुलांनी व विद्युत रोषणाईने करण्यात आली होती. भजन, कीर्तन, हर हर महादेवच्या जयघोषात पालखी दुपारी चार वाजता लोणी मार्गावरील चापेश्वर संस्थान येथून निघत शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवण्यात आली. सदर पालखीमध्ये भगवान विष्णू व पार्वतीची वेशभूषा केलेले लहान बालके आकर्षणाचा केंद्र ठरले. या वेळी महिलां, युवक व वृद्ध भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. टाळ मृदांग भक्ती गीतेच्या नादात भाविक तल्लीन झाले असल्याचे दिसून आले यामध्ये महिलांचा विशेष सहभाग दिसून आला.कार्यक्रमादरम्यान धार्मिक विधी, अभिषेक, आरती व प्रसाद वाटप करण्यात आले. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी स्वयंसेवक व स्थानिक प्रशासनाचे विशेष सहकार्य लाभले. सदर पालखी चे स्वागत करण्यासाठी नागरिकांनी, महिलांनी आपल्या घरासमोर रस्त्यावर स्वच्छता करत रांगोळी काढून पालखीचे स्वागत केले. यादरम्यान पालखी मार्गावर स्वयंसेवक व प्रतिष्ठित नागरिकांनी पालखीमध्ये सहभागी भक्तांसाठी चहा पाण्याची व्यवस्था केली होती. पालखी मार्गावरील भाविक भक्तांनी सदर पालखीचे दर्शन घेतले .या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व भाविकांचे आभार मानले असून, पुढील वर्षी हा सोहळा आणखी भव्य स्वरूपात साजरा करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी आरती मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी मेहनत घेतली